## निशाणी नं. ६९ वरील आदेश

**१.** सदरचा अर्ज हा अबेमेंन्ट सेटअसाईड करीता दाखल केलेला आहे. वादी यांनी वादी क्र. ४ यांचे वारस रेकार्डवर घेण्यासाठी झालेला विलंब झाला त्यामुळे त्यांचे विरुध्द दावा अबेट झाला. सदरचा अबेटमेंट चा आदेश रद्द करुन मिळणे करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**२.** वादी क्र. ४ यांचे निधन दि. १०/०५/२०२१ रोजी झाले आहे. त्यादरम्यान कोविड १९ या आजारीची साथ असल्यामुळे वादी क्र.४ मयत असल्याबाबतची माहिती व कागदपत्रे वादी वकीलांना देवू शकले नाहीत. त्यामुळे वादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर घ ोण्यासाठी विलंब झाला व वादी क्र. ४ यांचे वारस मुदतीत रेकार्डवर घेवु शकले नाहीत. त्यामुळे वादी क्र. ४ यांचे विरुध्द दावा अबेट झाला सदरची अबेटमेंट रद्द करण्यासाठी ६० दिवसांची मुदत होती. परंतु या मुदतीत देखील वादी यांनी वादी क्र. ४ यांचे वारस यांचे वारस रेकार्डवर आणले नाही त्यामुळे अबेटमेंट सेटअसाईड करुन घेणे साठी वादी यांना विलंब झाला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

**३.** सदर अर्जाला प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज करून टेनेबल नाही. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

**४.** दाव्याचे सुंपर्ण निराकरण होण्यासाठी वादी यांना संधी देणे गरजेचे आहे. सदरचा दावा ठरावासाठी आहे. वादी क्र. ४ यांचे वारस रेकार्डवर आल्यानंतर दाव्याचे संपुर्ण निराकरण होणार आहे. पुढील तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अबेटमेन्ट चा आदेश रद्द करण्यात येत आहे.

**(पी.एन.पठाडे)**

दिनांक : ०८/११/२०२१. दुसरे सह दि.न्यायाधीश,क.स्तर,उरण.